मालोजी पत्नी उमाबाई - मालोजीनंतर शहाजीचा सांभाळ (निंबाळकर) पवारांनी

शहाजी - ३ पत्नी - जिजाबाई - तुकाबाई - नरसाबाई
५ अपत्ये - एकोजी संतोजी

जिजाबाई पुत्र - संभाजी विवाह - विजयराव विश्वासराव
झीगनेरी विठ्ठलराव मुलीशी - जैताबाई
मृत्यु १६६०

↓

मुलगा उमाजी : मृत्यु - १६६८.

↓ मुलगा कान्होजी.

शिवाजी जन्म - १९।२।१६३० विवाह सईबाई

सईबाई ३ मुली -

१ ली सखुबाई विवाह महादजी निंबाळकर मृत्यु १६५९.
जन्म १६५७

२ री राणूबाई - जाधवरावांना दिली.

३ री - अंबिका - हरजीराजे महाडीक - मृत्यु २५।४।१६५९

संभाजी - विवाह - जिऊबाईशी इ.स. १६६७
जन्म १४ मे १६५७

— " — २ रा विवाह येसू इ.स. १६६७ पुत्र राजाराम
उधाराने

शिवाजी विवाह - पालकरांच्या मुलीशी - सगुणाबाई
— " — मोहित्यांची सोयराबाई
— " — गायकवाडांची सकवारबाई १०।१।१६५६.
त्यांना उमा - कमलाबाई विवाह नेताजी पुत्र.
सकवारबाई मृत्यु - औरंगजेबाच्या कैदेत.

शिवाजी विवाह - जाधवरावांशी उर्फ ~~६।२।६८~~ मृत्यु ६।२।६८
— " — इंगळे - पुतळाबाई १५।४।५७ - मृत्यु
२७।४।८०

संभाजींचे अष्टप्रधान -

मोरोपंत मृत्यु - ऑक्टो. ८० - त्यानंतर मोरोपंत पुत्र

निळोपंत पेशवा - राजाराम मृत्यूपर्यंत.

मुख्य कल्याणकेंद्री.

सचिव - सुरनिस - अण्णाजी दत्तो - मृत्यु - १६८१ . नंतर शंकराजी नारायण

रामचंद्र नीळकंठ - १६८० ते १६८५

न्यायाधीश - निराजी रावजी शिवाजी मृत्यूपूर्वी वारले - मुलगा

१६८० पर्यंत प्रल्हाद निराजी.

अमात्य - मुजुमदार - १६८८ रघुनाथ हणमंते - कारभारी गंगाधर जनार्दन

१६८३ रघुनाथांच्या मृत्यूनंतर नारायण रघुनाथ

पंडितराव - १६८२ ते १६८६ - दानाध्यक्ष - नंतर केशव पंडित

## प्रकरण : शहाजादा अकबर :

औरंगजेबाचा लहान पुत्र - रजपूत पत्नी दिलरसबानूपासून झाला.

जन्म ११ सप्टे. १६५८. विवाह सुलेमान शुकोहच्या मुलीशी

(कुलकाहिणीशी) सलिमा बानु बेगम १८/५/७२ रोजी.

दुसरा विवाह. कुलीगवरवरची कन्या ११/८/७५ रोजी

२० हजारी मनसबदार - मुलतान - लाहोर - औरंगाबादचा सुभेदार . १६८१

जसवंतसिंग राठोड मृत्यू . १६७८ औरंगजेबाने इंद्रसिंगाला

वारस नेमले त्यामुळे रजपुतांमध्ये बंड -

मोडण्यासाठी औरंगजेब स्वत: आला . १६७९

अकबर - रजपूतांना मिळाला व डुंगरपुरमार्गे - चर्चेनंतर जाहीर

शहाजाद्याने अकबराला पकडून आणण्याचा

प्रयत्न केला.

अकबराचें औरंगजेबास पत्र १६८३.
उर्फुरव - बऱ्हाणपूर - औरंगाबाद दुरावलें - आपल्या डोळ्यां
समोरचे हात तोफ ओढेल - राज्य रसातळास जाणार आहे.

संभाजीचे पत्र ११/५/१६८१ - पत्रांत शिसोदे व राठोड
यांचा गैरसमज होऊन - रजपूत सैन्य भाग सोडून गेलें.
औरंगजेबाचा डाव यशस्वी.
संभाजीने पालीजवळ त्याला छावणीस जागा दिली. जून ८१ अकबरं -
संभाजीने अकबरासाठी ३०० संरक्षक व अन्नसामुग्री पाठवली.
संभाजीचा हेतू - औरंगजेबाच्या सैन्यांत फूट पाडणें -
रजपूतांना कंटाळ्यास भाग पाडणें.

१३ नोव्हें ८१ रोजी - संभाजी अकबर भेट झाली पालीजवळ

संभाजी विरुद्ध - दोन कट झाले.

१) विषप्रयोगाचा कट - पन्हाळा - सोमाजी नाईक बापूजी नाळे
सूत्रविरुद्ध -
२) अकबराला राज्य देण्यासंबंधीं. — कुलेत कट - अंगरक्षक
कुरुष्ठा.

भागीदार. अण्णाजीदत्तो.
हिरोजी फर्जंद, राघो वासुदेव, बाळाजी आवजी.
हत्तीच्या पायी देऊन ठार मारलें -

शिरकाण झाले नाहीं.
पिलाजी शिर्के (सासरे) रायगडाचा ताबा घेतला.

अकबर - २०/२/८४ जैतापूरला होता.
त्याने पोर्तुगीज व्हाइसरॉयबरोबर बोलणी केली.
संभाजीने अकबराला मुद्दाम व्हाइसरॉयकडे पाठवलें.

संभाजी व अकबराने - १६८५ मध्ये भडोच घेतलें व
लष्करी मजल केली.
अकबर १६८७ पर्यंत धनाजी जाधवाच्या
मदतीने राजपुतान्यांत पुंडावा करीत होता
नंतर अडोचमार्गे इराणांत गेला.

इराणच्या शहाकडून मदत आणणे ता मुराद तेऊ.
अकबर हे १६८७ मध्ये इस्पहानला पोचला.
इराणच्या शहाकडून ३० हजार घोडदळ घेऊन निघाला.
मध्यंतरी संभाजीचा वध झाल्यामुळे मराठी सेना दक्षिणेकडे फिरली.
संभाजीने रजपुतांना बंडाचे आवाहन केले. (भेदनीतीचा वापर)

अकबराचे यशस्वी राजकारण संभाजी सेवला
शत्रूराष्ट्रात आक्रमण करून शत्रूला अंगावर घेण्याचे धोरण.

---

हिंदवी स्वराज्यावरील परचक्र :

शहाआलम - १६८५ मध्ये ५० हजार सैन्यानिशी औरंगाबादला आला.
परचक्राला तोंड देण्याची तयारी अत्यंत कुशली गती.
परचक्र घाटावर असताना शिवाजी मृत्यु बोदेली होण्यापूर्वी
संभाजी गादीवर आला.
१ मार्च १६८० कोकणात शहाआलमच्या जागेवर आला.
शहाआलम रजपूत बंड मोडण्यासाठी गेला.
निळोपंतांना त्र्यंबक नासिक आघाडी दिली.
हंबीररावांना कुऱ्हाड कोल्हापूर —— ".
जेधे शाबाबाडी -
१२ डिसें. १६८० बऱ्हाणपूर हंबीररावाने लुटले = दारूगोळा जाळला.
डिसें १६८१ औरंगजेब बऱ्हाणपूरला आला.
जाने. १६८२ - हसन अलीखान - कल्याण जाळले
एप्रिल १६८२ - शहाबुद्दीनखानने रामसेजला वेढा दिला
रुपाजी भोसले - मानाजी मोरेने वेढा तोडला.
डिसें १६८२ - युद्ध गणेशगांव
रणमस्तखानाने कल्याण घेतले.
रुपाजी भोसलेने रिटवाळ्याला युद्ध करून
रणमस्तखानाला घोड्यावर पळवले.

जाने. १६८३ - कोल्हापुरजवळ - सुलतान मोजमहाला
हंबीररावाने पराभव केला

आक्टो - ८३ - औरंगजेब अहमदनगरला आला

डिसे ८३ - शहाबुदीनखानाने निजामपूर लुटले.

(राजपूत बंडाच्यावेळी - जिझीयापट्टी - बिगरमुसलीमांना
नोकरीवर न घेणे थांबून - बंड उफाळले)

मनुचीप्रमाणे - औरंगजेबाच्या छावणीपासून ४ कोसावरचे
शहर - संभाजीने लुटले

बऱ्हाणपुरची आग - औरंगजेबाच्या वस्तीच्या ठिकाणी झालेला डिसें. १६८१
स्फोट.

माल्हेरचा किल्ला फितुरीने घेतला गेला -
(मुल्हेरच्या किल्लेदाराने फुटकेला)

रामशेजचा वेढा - सर्वबाबतीत अयशस्वी ठरला.
कुठलीही तोफ नसताना - चामड्याच्या तोफा वापरून मराठ्यांनी
हा किल्ला लढवला.

संभाजीचा शिक्का.
- श्री : शंभो : शिवजातस्य मुद्रा द्यौरिव राजते।
यदंकसेविनो लेखा वर्तते कस्य नो परि ॥
येसूबाईचा "श्रीसखी राज्ञी जयति"
- कैफत - "येसूबाई कारकिर्दी ई साहूराजा"

- संभाजीने कोणाकडे - वतने दिली नाहीत.
रोजमुऱ्याची व्यवस्था केली.

बाटलेल्यांना - पावन करण्यासाठी सरकार खर्च मंजूर करीत असे.
उदा. १८|३|८५ - पत्र गंगाधर रंगनाथ कुलकर्णी
कसबे तरसूल प्रांत औरंगाबाद.
शुद्धीकरणाच्या कामुदाईड मोहिमा सुरू केल्या.
गुलामगिरी बंद करण्यासंबंधी - पोर्तुगीज - इंग्रज = गुलाम विकत घेत
सामान्यतः किंमत १/२ होन असे.
संभाजीने - १२ होन जडावे बसविले. त्यामुळे गुलामगिरीला
पायबंद बसला.

शिवाजीचा मुन्सी काझी हैदर - १६८३ फितूर झाला.
पुण्याचा येसाजी देशमुख १६८२ — " -
अर्जोजी भोसले — "
जगदेवराव जाधव — " — " -

औरंगजेब स्वारी झाल्याने - शेडगावकर - खानदस्ते
भागातील देशमुख देशपांडे - मोगलांचे फितूर झाले.
शिवाजी जावई अचलोजी
संभाजी - भाऊ अर्जुनजी भोसले } फितूर झाले.
माणकोजी - [illegible]
[illegible] सावंत

संभाजीकडे आलेले लोक.
औरंगजेबाचे सरदार संभाजीकडे आले. } - मनुची
दिलेरखान भाऊ. बिरबातरखान — " -
सिद्दी संबूल - सिद्दी मिस्री — " -

संभाजीमुळे शहाआलम = दौलताबाद.

वाईदेशमुखांना - संभाजीची आज्ञा ता. ३।१।८४
रा. सेतोजी रामजी सरदेशी यांना जी संचणी लष्करासंबंधी
पाठविले आहे. - ते कुलास सांगितले

(New-Recruitment)

जखमी सैनिकांच्या नावे पेन्शन.

पत्र. २२।४।८४-

कृष्णाजी कंक - येसाजी कंकाचा पुत्र.

सालीना ५०० होन - असामी.

नासधुस झाल्यावर - पुर्ववत सालोसाली.

कर्जे - कर माफ - केले आहेत. उदा- राजापूर छापा १६८४ सिद्दीमुळे

ओस पडलेल्या शहराला चालना.

१६८५, ८६ च्या दुष्काळाची तोशीस

संभाजीनी स्वतःच्या रयतेला हाक दिली जाते.

संभाजीने एलेफंटाजवळ - आरमारी दुर्ग बांधण्याचा प्रयत्न केला.

संभाजीने आदिलशाही - कुतुबशाही - एकत्र उभारली.

पोर्तुगीज - मोगल एकत्र यायला देत नाही.

पोर्तुगीज - गोवा - स्वारी.

---

डॅनव्हर्सचे धोरण -

अंजदीवर संभाजीचा कोट उभारण्याचा प्रयत्न -
व्हाईसरॉयने निष्फळ केला.

१६८३ - चौलला संभाजीचा वेढा.

फोंड्याच्या वेढ्यांत - पोर्तुगीजांची हानी. १२०० लोक ठार.

करंजा व उरण - दोन्ही संभाजीने जिंकली.

फ्रान्सिस्को द. तव्होरा - याने - कोळवाळेच्या किल्ल्यांचा

संभाजीने - अरबांचे सहाय्य घेतले म्हणून व्हाईसरॉय - नाराज. १६८९

डिसें. १६८२ मोगली आरमार. ४४ जहाजे ११० गलबते १२ हजार माणसे मुंबईला आले.

संभाजीने १६८३ साली - चौलचा वेढा चालू ठेवून
चेंबूर - तळोजे - कोळवा - माहीम - उरण - सूपारा - कुरला
मोरा बंदर - ३ ठिकाणे पोर्तुगीजांच्या ताब्यातून सोडवली.

२५ ऑक्टो. ८३ व्हॉईसरॉय - फोंड्याला वेढा घालण्यासाठी निघाला

सैन्यबळ - १२०५ परकीय
२४०० फौजदी
५०० सैपर्स

बंदुका - ३२००
तोफा - ५ -
2 सोळा इंची - 2 बारा इंची
2 मैदानी 1 उखळी तोफ

२२ ऑक्टो. वेढा सूरू - पोर्तुगीज किल्ल्यात घुसले.
आतून मारा सूरू झाल्यामुळे - फिरंग्यांचे नुकसान झाले.

३१ ऑक्टो - संभाजीची मदत आल्यामुळे
वेढा उठला - दारूगोळा निकामी झाला
३०० खंडी तांदूळ - २०० बैल ठार मराठ्यांना.

११ नोव्हे. ८३ - पोर्तुगीज सैन्य - दुर्भाट येथे जहाजावर पोचले.

टेकडीवर संरक्षणासाठी व्हॉईसरॉयने माणसे ठेवली
त्यांना मराठ्यांनी फसवून अंगावर घेतले.
नंतर लपलेल्या स्वारांनी हल्ला करून
घोडा आडवा धरून - बंदुकांचे बार चुकवून १२०० बंदुकधारी मारले.
मराठ्यांनी - सर्व घोडे मारल्याने - सर्व तोफखाना जिंकला.
स्वतः व्हाईसरायला जखम झाली.

जुना गड तोडून - संभाजीने नवीन किल्ला बांधला.

संभाजीने - पोर्तुगीजांचा पूर्ण पराभव केला.

सेंट एस्टिफनची - चढाई - नोव्हे. ८३.

कोंड्यांतून वाचलेले पोर्तुगीज सैन्य -

कुळकावणी देऊन - स्टेफुन गडीकडे ओढून त्याचा संहार केला.

साळसेत-बारदेश - एस्रावळ इ. प्रदेश जाळून टाकले.

मारगोवाच्या सैनिकांनी शरणागती -

मारगोव्यापासून - असोळना - रिओ द साल बंदरावरील ३०० सैनिक
रचोलला पळून गेले.

साळसेलमध्ये १२००० सैनिक होते - सर्व पळून गेले.

बारदेशामध्ये - शिंगे मुतान्या वाजवीत मराठे घुसले.

त्यांनी - तिवीम - चैपोरा व इतर दोन्ही किल्ले.
ताब्यात घेतले.

४० पाद्रयांना घरहीन करून - हात बांधून फिरवले.

म्हणजे गोवा सोडून - सर्व प्रदेश संभाजीने स्वतंत्र केला.

डझण १५" - ४५ तोफा पाडाव करून नेल्या.

(हेतू मोगली युद्धासाठी तोफा दारूगोळा
मिळवणे - त्याप्रमाणे पोर्तुगीजांना त्रास देणे)

अनाथांना - ख्रिस्तीकरण करून मालमत्ता पोर्तुगीज
पाद्री घेत असत.

संभाजीने - राचोलच्या तुरुंग फोडला - कैदी मुक्त केले.
जनरी - मोनेस्टरी फोडली.

Holy House चे अत्याचार दूर झाले होते.

सर्व पुरंदर्शना नंतर संभाजीने वेढेरून मुक्त केले.

यांचप्रमाणे गोव्या सकोच तालचा प्रदेश देऊन मोंगलांना धानगोटा धंकगोळा जमिळव्याची व्यवस्था केली (परिणामी आरमार परत गेले)

व्हाईसरॉयने कोलावळे ला १६८१ साली किल्ला बांधला.

संभाजी थोडयाच्या दिरंगाईचे तह करीत -

केवा योग्यवेळी तह करीत (राजनिती)

पोर्तुगीज पराभवामुळे (१) इंग्रजांनी सिद्दी व मोंगल आरमाराला मुंबईत थारा दिला नाही

(२) मोंगली सैन्याला व आरमाराला रसद पुरवठा केला जात नाही.

(३) पोर्तुगीजांना धर्मविषयक धोरण बदलावे लागले.

शहा आलम स्वारी (गोवा)

उद्देश - आदीलशाही व स्वराज्य यामधील भागांत पाचर मारणे.

स्वारी १५ सप्टेंबर ८३ ते ७ मे ८४ च्या काळांत झाली

औरंगाबादहून बाहेर पडला — औरंगाबादला पोचला.

शहाआलम - कुरमाळे - रामघाटांतून बिचोलीला पुढे ८४ ला आला

सैन्य - ७० हजार घोडदळ
६० हजार पायदळ
१६०० हत्ती
२० हजार उंट.


याशिवाय आबेवारीत मोंगलांचे आरमार गोवे बंदरांत आले.

ह्या स्वारीसाठी ~~[illegible]~~ लिद्दा गण लाईल पुरवला गेला
आग्वाद ~~[illegible]~~ मांडवी खाडींत मोगली आरमाराचे.
२५ गलबते येऊ दिली.

औरंगजेबाचे - तारा कल्याण बाजुला
शहाबुद्दीन - देवघार भागांत
अजमशहा - आदीलशाही सरहद्दीवर
शहाआलम - वेंगुर्ला - आचरा - गोवा भाग

शहाआलम - वेंगुर्ला - लुटून देवळे फोडून गेला.
मोगली आरमाराने - आचरे लुटले.
शहाआलमला अपयश म्हणून बादशहाने कैदेत टाकले.
औरंगजेबाचे एकूण स्वराज्यावर - १ लाख सैन्य ओतले.
औरंगजेबाचे - पर्शियन स्वारीमुळे ~~[illegible]~~ लाख सैन्य उत्तरेत अडकले.

कु. कोंकण - तारा



# सिद्दी आणि मोगल आरमार — पृ. २००

आदिलशाहीचे आरमार जोपासले जाते.

जंजिरेकर सिद्दीचा प्रदेश — रोहा खाडी ते माणगांव महाड.
दक्षिणेकडे - १०० मैल लांब - बाणकोट खाडी.
उत्तरेकडे - ५ मैल लांब रोहा खाडी - मध्यभागी - १४ मैल - जिंकुणी.
राजपुरीची खाडी.

साधारणतः सिद्दी राज्य ३२५ चौ. मैल होते.

१६५९ व्यंकोजी दत्तोने तळघोसाळे पूर्णपणे जिंकले.
१६६० शिवाजीने इंग्रजांची मदत मागून जंजिरा मिळणी
१६६६ फत्तेखान जंजिरा देण्यास तयार - खैरातखानाने ठार मारले.
१६६९ शिवाजीच्या फिरंग्यांच्या सहाय्याने — शिवाजीने किल्ले घेतले.
१६७२ खांदेरीकोट बांधण्याचा प्रयत्न.
मोगल आरमार प्रमुख उमर व सिद्दी. १२ फ्रिगेट निघाली.
खांदेरीवर हल्ला
म्हणून मोरोपंतांच्या जंजिऱ्याला वेढा
मोगल आरमार मोरोपंतांवर तुटून पडले मराठ्यांचे
१५००० हजार माणसे ५० मचवे बुडाले
१६७३ फेब्रुवारी शिवाजीने १० पौंडी ८८ तोफा घेतल्या.
२००० मण शिसे.
१६७४ सातवळीच्या खाडीत दौलतखानाने - संबळचा पराभव केला.

१६७६ - दौलतखानाने - सिद्दीचे माजगांव येथील आरमार
जाळण्याचे ठरविले
इंग्रजांनी मुंबईबाहेर आरमार घालवून लावले.

चौल बंदराप्रमाणे
सिद्दीने उंदेरी कोट पूर्ण केला.
ऑक्टो. १६७९ ते १६८० — किल्ले दुर्गाडी बांधून झाला. — प्रमुख - भिवजी गुजर.

खांदेरी प्रमुख - माणकोजी.
सागरगड च - उदाजी पडवळ.
राजकोट (चौल खाडी - आणि कुंडलिकेच्या टोकाशी) - प्रमुख - सुभानजी खराडे

सिद्दी इंग्रजांना तोंड देण्यासाठी - पाउदगड - सागरगड - खांदेरी - कुलाबा
व राजकोट हे ठिकाणे सज्ज केले

२५ जाने. १६८० - दौलतखानाचा उंदेरीवर हल्ला. १० गुराबे ३०० लोक होते.
२९ ---"--- ---"--- ---- ४ गुराबे ३तीवारे २ गलबते
घेऊन ६०० लोक होते.

सिद्दीजवळ - २ मोठी जहाजे.
५३ महागीऱ्या.
२५ गलबते व ७० लोक होते.

शिवाजी महाराजांच्या मृत्युसमयी इंग्रजांनी सिद्दीला किनारपट्टीवर
उतरायला बंदर दिले नाही.

ऑगस्ट मध्ये - उंदेरीवर हल्ला - मायनाक भंडाऱ्याच्या कुमकसह ६०.
होड्या घेऊन माणसांचे गोदीत खांबांवर लावले.

सिद्दी संबूलचा मुलगा व मेहुणा सिद्दी मिस्री -
संभाजीच्या आरमारात होता.

२६ ऑगस्ट ८२ - सिद्दीने - कोळगांवजवळ - मराठी आरमाराचा
पराभव करून सिद्दी मिस्रीला ठार मारले. ८ गलबते मारली.
मल्हारपंत - इंग्रजांशी बोलणी करून कुमारीमार्गे
नागोठण्याला गेला.

१६८२ नोव्हेंबर डिसेंबर - मोगली आरमार मुंबईला होते.
---"--- सिद्दी कासीम उंदेरीला होता.
---"--- सिद्दी खैरात जंजिऱ्याला होता.
---"--- पोर्तुगीज आरमार वसईला तयार होते.
---"--- ---"--- चौलला तयार होते.


त्यामुळे जंजिऱ्यावरील वेढा रेंगाळला

मोगले आरमार - २० कोटी जहाजे
११० भागवले - इतून १२ हजार सैनिक
३ २५ लाख होन

१६८३ च्या दरम्याने - सिद्दी कासीम मोगली आरमार घेऊन
८ लक्ष मण धान्याची रसद घेऊन गोवा स्वारीवर गेला.
२८ डि. ८३ - मुंबईवर इंग्रजांनी मुंबई बेट स्वतंत्र म्हणून जाहिर केले.
८४ साली मुंबई गव्हर्नर केजविनने - सिद्दीला
आसरा दिला जाती.

८ मार्च १६८८ — जैतापूरच्या खाडीत - सिद्दी कासमचा पराभव.
मराठ्यांनी केला.

दादाजी रघुनाथ ने अनेकवार प्रयत्न करून जंजिरा घेता आला नाही.
गिरगांव पोर्तुगीज चर्चजवळ - सिद्दीने तळ ठोकला १६८८ कुलाबा.
सिद्दी इंग्रजांशी लढाई - त्यांत सिद्दीचे १२०० लोक ठार झाले.
—— माझगांव येथे - सिद्दीने इंग्रजांचा पराभव केला
इंग्रजांनी २०० मोहऱ्या देऊनी - सिद्दीला तोंड दिले.
माहीम - इंग्रजांच्या हातातून गेले.
आरमारी युध्दामुळे - मराठ्यांचे आरमार नावारूपाला आले.



# इंग्रज व मराठे.

१८।३।६२ - इंग्रजांना मुंबई बेट मिळाले.

१६६१ मध्ये पोर्तुगीझांनी - मुंबईचा ताबा - ऑक्झेंडनला दिला.

मुंबईतील रहिवाश्यांनी पोर्तुगीज जाचाला कंटाळून पोर्तुगीज सत्ता झुगारून देण्याचा कबजा दिला.

उस्टीक - शिवाजीकडे गेला. इंग्रजांनी दारूगोळा नाकारला म्हणून १ लाख तोंडजोडनंतर ५००० मुळ नुकसान भरपाई मंजूर केली.

सुरतवर इंग्रजांनी मुंबईकरांना - शिवाजीला तोफा न विकणे असा सल्ला दिला.

शिवाजीचा हेतू - राजापूरची वखार बंद होऊ नये. असा होता.

१६६८ मध्ये रोल्ट मुंबईचा प्रेसीडेंट झाला.

१६६८ मध्ये मुंबईत इंग्रजांनी देशी राईप जुळवून छापखाना सुरू केला.

६ ऑक्टो. १६७९ केजविनने १ युध्दनौका ३६५ माणसे खांदेरीवर हल्ला केला.

मराठ्यांनी इंग्रजांचे गोफ जहाज पकडले.

मराठ्यांची ४८ गलबते बुडाली.

नौदल रिवेंज - युध्दनौकेच्या जोडीला - ॲरफ्रेज व फेर्च्युन जहाजे - मायेली १२ तोफांनिशी दिली.

इंग्रजांना पळून जावे लागले.

मराठ्यांनी खांदेरीवर १२ तोफा - १००० गोळे.

१००० लोक तयार ठेवले होते.

२८ जाने. १६८० इंग्रज मराठे तह झाला.—

१) मरणारवाले, इंग्रज - शिवाजीने त्रिगुण श्रीना इंग्रजांच्या राज्यात येण्यास परवानगी.

२) सिद्दीला इंग्रजांनी युद्धसाहित्य देवू नये - दाणागोटा द्यावा.

३) मुंबईचा रहिवासी दाडदरवान यांस - कैराबातेर घालवावा.

रवांदेरी खेर. ११- जाने १६८० रोजी पूर्ण झाला. इंग्रजांचा वेळ उघाड.

संभाजीने उंदेरी जवळील - एका बेटावर खेर बांधण्यास सुरुवात केली. १६८२.

सिद्दीच्या त्रासामुळे - मराठी मुलुखावरून लोक दूर निघून जाती —
गुरेढोरे लोकांनी दूरवर नेवून ठेवली.

१६८३ डिसेंबरपर्यंत - संभाजीने - माहीम, केळवे, ~~सहार~~ सहारगांव
सोपारे - कुरंजा - इ. ठिकाणे काबीज केली. इंग्रज घाबरले.

मुंबईकरांनी सुरतकरांकडे मदत मागीतली. न दिल्यामुळे
स्वतंत्र बेट म्हणून जाहिर केले.

केजवीनने - चाइल्ड व वॉर्ड यांना कैदेत इंग्लंडला पाठवले.

(संभाजीने ४० हजार होन देवून मुंबई ताब्यात घेण्याचे ठरवले.)

संभाजी व केजवीन तह. राजगड. १० (१५ मे ८४).

कुर्तिसाठी - तह.

१) आयातीवर २१/२% जकात निर्यातीवर जकात नाही.

२) माणसांची - खरेदी विक्री माझ्या राज्यात चालणार नाही.

३) सरकार कामांच्या परवानगीवाय - कुणीही माल विकण्याची जबरदस्ती नसे.

४) इंग्रजांच्या जहाजावर जकाती नाही.

५) माझ्या नागरिकांची कर्जफेड सरकार करून देईल.

६) इंग्रजांना नारळपुरते जागा देण्यात येईल.

७) इंग्रजांनी चोपळे येथे वखारी स्थापन करण्यात.

वखार ~~६०~~ १८०' x ४५' x ८' उंच x २' रुंद भींत असावी.

पोर्तुगीजचे प्रोत्साहन - डच, फ्रेंच यांच्या प्रोत्साहनासाठी आले.

मुंबईचा तह:

१) मोगलांच्या जहाजांत इंग्रजांचा माल असल्यास परत मिळेल.
२) इंग्रजांनी नागोठणे पेण येथे वखारी उघडाव्यात

इंग्रजांना - राजापूरहून १५०० खंडी मिरी मिळे.
१६८४ च्या दरम्यान १५० ——— " मिळू लागली.

१६८४ च्या आसपास संभाजीराजांनी भडोच ताब्यात घेतले.

## छत्रपती संभाजीचरित्र - वा. सी. बेंद्रे.

### स्वराज्यातील घडामोडी -

स्वराज्याची राजधानी - रायगड असली तरि - तंजावर ३ भाग.
आदिलशाहीला सहाय्य करणे - पन्हाळा - युवराज धाजी केली गेली.
येसूबाईला - राजाज्ञा काढण्यासाठी मुलकी अधिकार दिले.
युद्धनिर्णय - स्वतःच्या ताब्यात ठेवले.
संभाजीकडे असलेली निरवार कुर असल्यामुळे - येसूबाईवर विश्वास.
मुलकीविभाग - परराष्ट्रांशी नीगडीत म्हणून - अंबिकाबाई व हरजीराजे
महाडीक यांची नेमणूक.

गोष्टी घडु घली:
- १६८८ - शिवाजीराजेंनी - त्रिकूटजवळ - शेरखान बैरागमाच्या पाडाव केला.
- १६८८ - आबंदराव मोलेर गड घेतला.
- २९ सप्टे. ८९ हरजीराजे - मृत्यु पावले.
- २८ ऑक्टो ८९ राजाराम जिंजीस आला.

परकीय आदीलशाहीला जाळा घालण्यासाठी
म्हाळाजी निराजी, गिराजी रावजी, शामजी नाईक
यांनी आदण्णा मादण्णा संगनमताने कुतुबशाही
मराठशाही एकत्र आणली.
जिंजीचा सुभा - शिवाजीबंधु - संताजीच्या अमलाखाली होता.
रघुनाथ हणमंतेला - कुतुबशाहीत संभाजीने अटक घडून - नंतर सोडले
व पुन्हा मुजमूचा अधिकार दिला.
संताजीच्या सहाय्यास - रघुनाथ हणमंत व गोपाळ दादाजी होते.
जेसुईट पत्रव्यवहाराप्रमाणे -
हरजीराजे महाडीकांनी - केसोजीच्या सैन्यासह
म्हैसूरच्या कुमारय्याच्या सेनेचा पराभव केला, आणि मदुरेच्या
नायकाच्या म्हैसूरकरांनी बळकावलेला प्रदेश सोडवून
मराठी साम्राज्याला जोडला.

— मदुरेच्या राज्य - पांचजणांत वाटला गेला.

१) म्हैसूरकर
२) रामनाडचा मरवा नायकु
३) संभाजी - हरजीराजे
४) एकोजी - तंजावरकर.

२२ सप्टें. ८७ कुतुबशाही खालसा झाली.

एकोजीराजेंच्या प्रदेशांतील कुमदूर - चिकुरहळ्ळी - लालगोंडल भाग - मोगलांनी घेतला.

११ जुलै ८८ - कासिमखानाने बेंगलोर जिंकून घेतले.

केसोपिंगळे व हरजीराजे यांच्यात बेबनाव झाला - संताजी भोसले केवळ संताजी केसोपिंगळेच्या बाजूस झुकला.

२४ डिसें ८८ हरजीराजांनी मोगलांकडून जिंजि जिंकले -

व्यापारवृद्धी.

इंग्रजांच्या वखारी - राजापूर, कारवार, बोर्डलोव्हो,
होनावर - कुडाळ

डचांच्या — " — वेंगुर्ला - अंजनवेल.

पोर्तुगीजांच्या वखारीतून - १६८८ मध्ये.

८५०० गाठी कपडा विकला. एकूण विक्री २१½ टन सोने.

संभाजीराजांचा जकातीपोटी — ३/४ टन सोने मिळाले.

फ्रेंचांच्या वखारी - राजापूर व पाँडेचरी.

# औरंगजेबाच्या हालचाली.

१६८४ - गाझीउद्दीनखान - जुन्नरास तळ देऊन होता
— " - सुलतान तारा - ४० हजार सैन्यानिशी कल्याणला रवाना.
— " - कुळुकारवान - नीरा नदीच्या दिशेने.
— " - बहरामंदखान - अष्टीकडे.
— " - असदखान - विजापूरकडे रवाना.

गानाजी मोरे - गंगाधर वासुदेव - राहुजी सोमनाथ - ३० ऑक्टो. ८४.
दोघां संभाजीने कैद केले. (जेधे शकावली).
तिर्थदंकी जाली म्हणून औरंगाबादकडे फितुर होऊन जात असता
पकडून सजा दिली कट उघडकीस आणला.
गाझीउद्दीनखानाने १६८५ रायगडपासून ५ मैलावरील गांगोली
गांव जाळले - (पेठ हुरडो) पुणे शिवापूर मोगली ताब्यात गेले.
संभाजीने - खानदेश लुटला व कामबक्षाच्या फौजेला वर रोखले.
— " - धनाजी जाधव व दुर्गादासामार्फत
भडोच जिंकून - बुंदेलखंडापर्यंत मजल मारली.
सुलतान तारा - डोण्णळच्या वेढ्यात हल्ल्यात कैद झाला
१ विष घेऊन आत्महत्या केली. (१६८५)
संभाजीने आग्रा मार्गावर - धनाजी जाधवला पाठवले.
औरंगजेबाने बंदोबस्तासाठी खानजहान बहादूरला पाठवले.

उदय व मृत्यु.

जेधे शकावली.

१२-१२-८८ संभाजीराजांनी (रायगडास सोडाग वरे)
मल्हारबिराजी इ. सरदार कृनाना धरले.
औरंगजेब तुळापुरी आला.
१-२-८९ } बेसजी - शिर्के फुर्क्द यांचा चढ़ेबोर
१-२-८९ } संभाजी व कुबजीला, खोरत निजामने
संगमेश्वरी पकडले.
१२-फेब्रु-८९ — राजारामाला मंचकारोहण केले.
(१२ नो. ८८ - संभाजीने कुबजीच्या मदतीस जाऊन
खेळण्याच्या ठिकाणी - शिर्क्यांचे बंड मोडले)
१६८८ च्या अखेरीस - महाराष्ट्राच्या दक्षिण सीमेवर
महामारी उद्भवली - १ लाख सैन्य मृत्यु पावले.

नोव्हें. ८८ - मुकर्रबखान उर्फ शेख निजाम (आदिलशाही सरदार)
आणि - अजमशहा दोघेहि मराठी स्वराज्य
दाक्षिणेकडील भाग जिंकण्यासाठी निघाले.

१६८८ च्या दरम्यान - आदीलशाही कुतुबशाही
खालसा करून मोगली फौज
मावळ, कोकण - पन्हाळा -
स्वराज्याच्या तिन्ही दिशांना मोर्चे लावून
स्वराज्य खालसा करण्याचा भाग होते -
पूना रोहिडेश्वर, शीरवळ, कल्हेपठार
हा संपूर्ण भाग - मोगलांच्या ताब्यात

होता. त्यामुळें मावळ प्रांतातील सर्व देशमुख देशपांडे फितूर होऊन ठाणेचें इनाम वतन संभाळीत होते.

कब्जी कुलेशाकडे - पन्हाळा व प्रभावळी सुभा होता. त्याचप्रमाणे मलकापूरची पागा या सुभ्याखाली येत होती.

कुलेश पन्हाळ्यावर असतां शेख निजाम कोल्हापूरला आला. त्याला शिर्के मंडळी मिळाली. सैन्यसंख्या वाढल्यामुळे कुलेश खेळण्यावर गेला.

इंग्रजांच्या पत्राप्रमाणे ४५।८९

पन्हाळ्यावर राजारामाला पकडून मोंगलांकडे देण्याचा प्रयत्न फितुरांनी केला -

कब्जीच्या निरोपावरून संभाजी स्वतः पन्हाळ्यावर आला - पन्हाळा घेऊन - येसाजी व सिदोजी फर्जंद यांचा कडेलोट केला.

औरंगजेबाचे - असदखानास पत्र -

"दुराचारी मुसलीम फलणूक करणाऱ्यांना संभाजीला कैद करण्यासाठी शेख निजामाला रायरीवर पाठवा"

रायगड शेजारील आगाऊ - शिवा-प्रभावळीचा सुभा यास शिरकाण म्हणत असत

गणोजी मोंगलांना किल्ला व पन्हाळा देण्याचा प्रयत्न केला म्हणून संभाजी व शिर्क्यांत बेबनाव झाला.

शिर्क्यांनी संभाजीपत्नी दुर्गा हिला मोंगलांच्या सहाय्याने पन्हाळ्यावर छापा घालून पकडले - तिला मोंगलांनी दौलताबादच्या किल्ल्यावर ठेवले होते. तिथेच तिला मृत्यु आला असावा.

शिर्केंच्या फितुरीमुळे जिंजी - राजारामाने त्यांचे दाभोळचे
वतन खालसा करुन खेडे बल्लाळ चिटणीसांना दिले.

शहा आजम पुण्याच्या मार्गे रायगडाला वेढा घालण्यासाठी आला.
त्याला त्रास देण्यासाठी उपराळा करण्यासाठी खेळूडी मोडून संभाजी
पन्हाळ्याहून संगमेश्वर मार्गे रायगडाला निघाला.
पन्हाळा घाट्यावरून सुरक्षीत जवळ कुरण सगळीकडे
मोगली सैन्य पसरले होते.

सेंट जॉर्ज - इंग्लंडच्या राजाला पत्र १६८५
"औरंगजेब रायगड घेऊ इच्छीतो. संभाजीला जीवंत
पकडण्याची आशा करीत होता"

औरंगजेब - पन्हाळ्याकडे न जाता अकलूजला आला
अकलूजहून - बहादूरगड - पेडगांव - तिथून औरंगाबादला
आला

१३ नोव्हेंबर - अकलूजला आला
१४ डिसेंबर पर्यंत - " -
१५ फेब्रुवारी बहादूरगडला होता
३ मार्च - औरंगाबादला होता.

मासिरीलीळ नोंदीप्रमाणे रायगड घेण्यासाठी
इतिकादखान संभाजी पन्हाळ्यावर असतानाच आला होता.
अब्दुल रैरतखानाची किल्लेदार म्हणून नेमणूक झाली होती

मासिरीलोक खुलेरव —

शेरव निजामने - खेळण्याच्या आसपासचा मदेश - मोगलांनी व्यापला

शेरव निजामने आपले हेर सर्वत्र पेरले —

संभाजीराजे खेळण्यावरून - संगमेश्वरी आले. जलद आगमन

समजताच - शिर्क्यांच्या सहाय्याने शेरव निजाम

आडवाटेने संगमेश्वरावर आला.

संभाजीस कुलदैवत - तळघरात रव्यासरवान निजामपुत्राने

पकडला व निजामाच्या हत्तीसमोर सादर केला.

कोल्हापूरच्या देसाईच्या उठावासाठी - अहवालासाठी संभाजी ७/२

दिवस संगमेश्वराला थांबले असावेत. (शिर्क्यांचे सरदेशमुखीचे वतन

संभाजीने जप्त केले)

संगमेश्वर ते बहादूरगड अंतर २४० मैल होते

निजाम १५ फेब्रुवारीला बहादूरगडावर पोचला.

म्हाळोजी घोरपडे - ठार झाले

रायाजी बाबूळ - संताजी घोरपडे पळून गेले.

औरंगजेबाचे नांव मैरंगजेबाने - आसदनगर ठेवले.

मासिरीप्रमाणे - बादशहाच्या छावणीत - इदेसारखा - उत्साह पसरला.

संभाजीची कैद हि आनंदाची बाबत मानली गेली.

औरंगजेबास इतर ५ मुली - यापैकी ४ थी ५ वी यांची लग्ने झाली होती.

२ री - बदकाबेसा - १६६० मृत्यु

१ ली - झेबुन्निसा - जन्म १६३८ मृत्यु १७०२

संभाजीस २० वर्षांची मेहेरो (अढवर मचरणात कैदेत होती) वय ५८

२ री - झिनतुन्निसा - जन्म ५ ऑ. ४३.

संभाजीच्या मृत्युसमयी ४५ वर्षे वय होते.

शिवकालीसेबे - बाळराजा शाहू व येसूबाईच्या आदेशाने
वागाडेण्याची छामगिरी ठेवी. २०१४ पर्यंत अवेवाहीत होती.
मासिरी - चाकुरनाम - इत्यादे प्रमाणे:
जिभ उपटर - डोळे काढन - कातडी सोलन - पेंढा भरुन:
११ मार्च ८९ रोजी संभाजीस - कोरेगांव मुद्‌पी - ठार मारले -
वुकजी उळशाम ॥
औरंगजेबाची छावणी - तुळापूर संगमाच्या उत्तरेकडे होता.
सैन्य छावणी - नदीच्या पूर्वेकडे - कोरेगांवपर्यंत पसरली होती.
या छावणी प्रदेशात - आपटे व वडू खुर्द दोन
गांवे येतात.

खरोअतुळिंगतच्या माळावर वृंदावन असे.
शिवाजीकालीन सरकारकुन - मोरोपंत, रघुनाथपंत, जनार्दनपंत, मोरेश्वर पंडितराव
हंबीरराव व आनंदराव मृत्यु पावले.
अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, अहुबर कुलकर्णी - सजा पावले.
संभाजीने शंकराजी नारायण यांस सचिवपद १५ साली दिले.
संभाजीच्या मृत्युनंतर - रामचंद्रपंतांने - संताजीला स्वतःच्या फुडांत सामावून घेतले.
त्यामुळे धनाजी व शंकराजी.
रामचंद्रपंत व संताजी असे सरसुभ्यामध्ये दोन गट झाले.
२५ मार्च ८९ झुल्फीकारखान (वजीर पुत्र) रायगडाला वेढा घातला.
संताजी, बहिरजी, मालोजी तिन्ही घोरपडे बंधुनी
मे १६८९ मध्ये पातशाहाच्या डेऱ्याचे कळस कापून आणले
व विशाळगडी राजारामासमोर ठेवले. म्हणून पदव्या.
संताजी - ममालकदार
बहिरजी - हिंदुराव
मालोजी - अमीर उल उमराव
विठोजी चव्हाण - हिंमतबहादूर.
राजाराम - तुंगभद्रातीरी पळाला गेला या बातमीबरोबर
येसूबाईने रायगड मोगलांच्या स्वाधीन करण्याचे
राजकारण केले. (१८ ऑक्टो. ८९) रायगड पडला.

संभाजीचे चरित्र राजाराम शास्त्री भागवत
६।८।२, इ.स. १८९२

निव्वळ बखरीवर आधारित इतर पुरावे दृष्टीस धरले नाहीत. त्यामुळे लिखाण एकतर्फी झालेले आहे.

---

संभाजी चरित्र वा. सी. बेंद्रे

स्वराज्यातील निरनिराळे:
शिवाजीबरोबरची जुनी पिढी संभाजीच्या काळी नव्हती.
संभाजीकाळात मोरोपंत, रघुनाथपंत, जनार्दनपंत, मोरेश्वर पंडितराव
हंबीरराव, आनंदराव मृत्यु पावले.
युद्धात - मुकुंद, अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी. अखेर युद्धात ठार मारलेले.
मोरोपंतपुत्र - निळो मोरेश्वर पेशवा - उत्तर कर्नाटकच्या स्वारीवर होता.
रायगडावर - प्रल्हाद निराजी शिवाय वडीलधारी उपस्थित नव्हता.
सरनौबत धनाजी - राजस्थानात होता.
किल्ले व चौक्यांत संभाजीने माणसे पेरून ठेवली.
उरलेले सैन्य धावत्या तुकड्यांच्या स्वरूपात होते - म्हणून रूपाजी भोसले, मानाजी मोरे.
कुटुंबात - शिवाजीपत्नी सकवारबाई - राजधानीत होती.
संभाजीपत्नी येसूबाई - युद्धकुशल होती.
संभाजीबंधू राजाराम सामान्य. १८/१९ वयाचा पोरसवदा.
त्यामुळे - संभाजीच्या काळी रायगडावर जबाबदार वडीलधारी उपस्थित नव्हते.
औरंगजेबाच्या दबावामुळे पुढील काळात येसूबाईने रायगड लढवण्याचा आणि राजारामास बाहेर पाठविण्याचा विचार केला.
२५/९/८९ राजाराम पन्हाळ्यावरून वेढा तोडून निघाला.
२९/१०/८९ — देवळेस पोचला.

राजारामासोबत मानसिंग, मल्हारपंत, निळो मोरेश्वर, बहिरो मोरेश्वर
खंडो बल्लाळ, बाजी व खंड्या उदम,
शंकराजी नारायणाने शेरखानाचा पराभव करून राजगड इ.स. ८९
मध्ये जिंकला.
संताजी घोरपडे ~~धनाजी~~ ना व त्यांच्या बंधूंनी
शेख निजामाचा कोल्हापूरच्या आसपास पराभव केला.
हत्ती, घोडे इ. सामान हस्तगत केले.
संताजी घोरपडे बंधूंनी तुळापुरी छावणीवर हल्ला चढवून
[illegible]च्या दरम्याने डेऱ्याचे कळस कापले.
येसूबाईने दिलेले जडजवाहिर गिरजोजी यादवाने राजारामाकडे
पोहचविले.
रामचंद्रपंत विशाळगडावर कबिल्यासह गुप्त राहिला - इतर देशावडील
शंकराजी नारायण सचिवांना अमात्याने कुदन
यामुळे सरदारमंडळी शंकराजीकडे जाऊ लागली. — ,, —
सचिवपद पुन्हा प्राप्त झाल्यानंतर - सर्व सरदार — ,, —
सचिवांकडे परत आले.
राजाराम पन्हाळ्याच्या वेढ्यातून पळाला - त्याचा — ,, —
यवनांनी पाठलाग सुरू केला. संताजी जगताप
यवन फौज रोखण्यासाठी थांबला. — ,, —
रूपसिंग भोसले - राजाराम तुंगभद्रा पार करीपर्यंत
यवन फौज रोखून होता.
बहिरजी घोरपडेने — राजारामाला जिंजीत पोचते केले. — ,, —

माहितीतील उल्लेख.

सूर्याजी पिसाळ - वाईचा देशमुख याने वेढा घालण्यात
मोगल सरदाराला सहाय्य केले. पुरावा पिसाळ फितुरी,

बादशहाच्या हुकुमावरून इतिकादखान वजीराचा पुत्र
हसनअलीने — तुंगभद्राकाठी तारागडाजवळील
राजारामाच्या छावणीवर हल्ला केला

राजाराम पळून गेला. इतर घोरपडे बंधू - मारले गेले. कैद झाले
विजापूरच्या किल्ल्यांतील तुरुंगातून पळून गेले.
राजाराम कैद झाला हे समजल्यावर हमीजेखानास त्याला आणण्यासाठी
बादशहाने पाठवले.

मासिरमाणे -
१९ ऑक्टो. ८९ रोजी इतिकदरखानाने रायगड घेतला.
२३ ऑक्टो. ८९ रोजी इतिकदरखानास झुल्फिकारखान बहादूर
पदवी २ हजारी मनसब, पोशाख, घोडा, चांदीचे भांडे
३० हजार रु. रोख दिले.
रायगडावरील संपत्ती घेण्यासाठी अब्दुल रहिमखानाने
कैलुलाला पाठवले. त्यांनी सकवारबाई येसूबाई शाहू
मदनसिंग, उध्दवसिंग, भवानीबाई इ.ना अटक केली.
शाहूला राजाकिताब ७ हजारी मनसब, ध्वज, नगारा
दिला. मातेला बक्षिस दिले. आणि गुलालबारस
ठेवले.
१६८९ च्या दरम्याने मोगलांनी खांदेरी, कुलाबा, पद्मदुर्ग वगळता
बाकी सर्व किल्ले कोकणातील किल्ले ताब्यात घेतले.

## राणी येसूबाई

पिलाजी शिर्के कन्या येसूबाई पतीच्या सहवासाने वावरली.
शृंगारपूरहून रघुनाथ पंडीतराव, मोरेश्वर पंडीतराव डबाकपंडीत
दरबारात आले.
भवानीबाईचे लग्न - शंकराजी महाडीकसोबत लावून दिले.
शंकराजी सोबत ती सती गेली.
राणी - दुर्गोजी व अंबोजी दोन पुत्र होते.
दुर्गोजीला - शाहू दप्तराप्रमाणे मौजे आंबोळे ता. तारळे
इनाम दिला होता.

चंपा येसूबाईसोबत इ.स. १७१९ साताऱ्यास परत आली आणि वारली.
वंपाची मुलगी संभाजीच्या मुलीचा विवाह.
सिकंदरखान विजापुरीचा पुत्र मुहम्मद आलेउद्दीनशी,
जानेवारी १७०४ मध्ये झाला बादशहाने
८००० रु. जाहेर केला — इति मासिरी.
राजाराम पत्नी जानकीबाई रायगडावर पकडली गेली. १६८९
येसूबाईबरोबर - १७१९ साली परत आली — इति मासिरी
आघरखानाचा नातू समशेरबेग सोबत
राजाराम कन्येचा विवाह झाला.
२५ डिसें. १७०३ — बादशहाने उरिन्याच्या जगहरा जाहेर केला.
२८ जाने. १७०४ राजाने कुनाकाचा विवाह राजाराम कन्येशी झाला. पोशाख आहेर दिले. } इति - मासिरी.

जिंजीचा किल्ला ७ फेब्रु. १६९८ रोजी पाडाव झाला.
राजारामाच्या चार बायका (नायकशाळा)
३ मुलगे २ मुली कैदेत गेल्या - मआसिरी व कदासचे इशन.
गणोजी शिर्केच्या सहाय्याने
ताराबाई व राजसबाई शिवाजीला सोबतीला घेऊन
९ जून १६९८ रोजी जिंजीच्या वेढ्यातून पळून गेल्या.
येसूबाई - "राजाज्ञा" म्हणून — आज्ञा देत असे.
व्यक्तिगत पत्रावर "अज रख्तखाने सौ. येसूबाई"
म्हणून लिहित असे.
" सरवी राज्ञी जयति" हा शिक्का होता.

राजारामाने - शाहूच्या मालकीचे राज्य या नात्याने सांभाळले.

शाहूने राजारामाची - वृंदावनाची देखभाल केली.

शाहूचा ताराबाईसोबत पत्रव्यवहार होता.

येसूबाईने - राजारामास नजरकैदेत प्रेमपूर्वक सांभाळले.

राजारामाने शाहूला कैदेतून सोडण्याचे खूप प्रयत्न केले.

संभाजीच्या मृत्युनंतर - राजाराम पुरस्कर्ते - रामचंद्रपंत आणि
प्रल्हादपंत - येसूबाई आणि शाहू यांना - पाठिंबा देणे संभवनीय
नव्हते - मराठा मंडळात फुटाफूट संभवनीय होती.

येसूबाईने - राजारामाला जिंजीकडे पाठवून - फुटाफूट टाळली.
स्वराज्यरक्षण आणि स्वतः कैदेत जाण्यास तयार झाली.
बादशाही फौज दोन्ही जागात विभागली गेली.

रायगड किल्ल्यात सर्व अडकले असते तर - राजपुरुषासह
सर्व स्वराज्य खालसा झाले असते.

येसूबाईने चिंचवडकरांना पत्र अहमदनगर कैदेतून.
"पैक्याच्या तळावरून - वाचवावे, कर्ज घ्यावे".

शाहूचा विवाह 1703 मे - औरंगजेबाने ———— मासिरी.
"बहादूरजीच्या मुलीशी लावून दिले"

इ.स. 1705 - औरंगजेबाच्या दोन दरबारींचे - हमीदखान व
फिरुजजंग यांचा झगडा शाहूने सोडवला.

इ.स. जाने. 1705 - शाहू व नसरतजंगखान - यांनी कोंढाण्यावर
हल्ला केला. धनाजी जाधवने नाटक केले.
मराठ्यांनी किल्ला खाली करून दिला.

औरंगजेब 22 वर्षांनंतर - अहमदनगरला आला. 20 फेब्रु. 1705

शाहूने औरंगजेबाच्या दफनस्थानाची - चांगली सोय लावली.

इ.स. १६९९ मध्ये राजारामाने स्वतः औरंगाबाद मुहीमो बादशाही छावणीवर छापा टाकुन प्रयत्न असफल झाले.

औरंगजेबाच्या मृत्युनंतर - झुल्फीकारखानाने - शाहूला सोडून दिले.
शाहूच्या विरोधात - रामचंद्रपंत निळो मोरेश्वर, व परशुराम त्र्यंबक.
सहभागी झाले.

शाहूने १७०८ मध्ये सिंहासन ताब्यात घेतले.

शाहूने आपल्या खास लोकांना दिलेल्या सूचना.

"रायगड यांत, चंदोमांत, येथील गडदुर ताब्यात घेणे.
माताजी, मदन सिंग, दुर्गाबाई, आनंदीबाई, इ. मंडळीला
ताब्यात घेणे."

येसूबाईचे दिल्लीहून प्रयाण -

१२-४-१७१९ - मोगलसराई.
१४-४-१७१९ सूरज.
१५-४-१७१९, आनंदपूर.
१६-४-१७१९, सराई सिकंदरा.
१८-४-१७१९, कोरसे - किळसा.
१९-४-१७१९ - कुराई सराई.
२१-४-१७१९ मुराई ——.
२२-४-१७१९ सिहोरे.
२४-४-१७१९ हांडे.
२९-४- चारवा.
२- मे १७१९. रतनपूर.
४- मे १७१९ पिपळोद.
६ मे १७१९ लापीतीर.

येसूबाईचा दफनविधी - संगम माहुली . कृष्णावेण्णा संगम.

शाहूचा — " — — " — — " —

ताराबाईच्या प्रमाणमाणे — शाहूच्या अस्थी नांदगांवच्या घागरीत
ठेवल्या होत्या. चाळीस जणांचे ठरविले होते.
रखवालीस माणसे न ठेवल्यामुळे - अस्थी सहीत घागरी
चोरल्या गेल्या.

शंभुराजाच्या देवळासमोर (दक्षिणेकडे)
शाहूच्या समाधीसमोर - (उत्तरेकडे) येसूबाईची समाधी असावी.
येसूबाईच्या समाधीच्या नैऋत्येस - चंपाराणीची समाधी असावी.
— " — पश्चिमेला - विरूबाईचे थडगें आहे.

मल्हारजिराजीनें राजाराम जिंजीला असतांना -
१ लाख रु. लाच घेवून - मा-याचे किल्ले इंग्रजांना दिले
इंग्रजांनी मोगलांना दिले. — जिंजी मोगलांच्या ताब्यांत गेली
मल्हारजिराजीवर हे आरोप झाल्यामुळे गळ्यांस लावून
आत्महत्या केली "ही खबरी"

परशुराम त्र्यंबक - रामचंद्रपंताचा तस्तू - केसरी आत्महत्या केली.

येसूबाई व शाहू यांच्या सोबत गेलेल्या चाकरमाणसांची
इनामे रामचंद्रपंत, परशुरामपंत, मल्हारजिराजी यांनी
हडप केली.
नेमून राजारामाने, ढोधराजी नारायणाचे । दानधाडणी केली :-

राजारामाचे पत्र : १० ऑगस्ट १६९८.

"चि. शाहू व कुटुंबे याबाबत बेमार आल्यास. त्यांचे अंकुश
व पदास धक्का बसेल असे स्वामीस वाटते.
चि. शाहू जोवरून श्री देवी जाणोत.
संकटी जी माणसे उपयोगी पडली त्यांच्या तसनसी आम्ही करविल्यास
असी चार जी तुम्हीं केली - स्वामिद्रोहाचेच करणें.
ते पुरस्सर सर्व - राज्यास अधिकारी.
आम्ही करतो ते कुठल्या लोकांचे साठीच.

प्रसंगास सर्व लोकांस तिकडेच पळणे येईल.
असले अरीस न करणे.

---

रामचंद्रपंताचे महाजनांस पत्र.

स्वस्ति राज्याभिषेक शके ३४. आश्विन शु॥ ३ सौम्यवासरे (१८ सप्टें. १७०७)

" सोमनाईक देसाई - देशकुलकर्णी ता। सेतवडे. - यासी आज्ञा. थोरल्या स्वामींनी बहुत श्रमे राज्य संपादून संपूर्ण केले. संभाजी राजे झाले यांनी विध्वंसून टाकले.

- कैलासवासी स्वामी (राजाराम) राज्याधिकारी झाले. त्यांनी स्वपराक्रमें नूतनच राज्य संपादिले.

- त्याच्याच पराक्रमें करून.

- हे राज्य थोरले - स्वामींनी तिर्थरूप स्वामींस (राजारामास) द्यावयास केले होते. त्यास (शाहूस) राज्याशी कांही संबंध नाही. धनाजी जाधव सेनापती. हैबीरराव मोहीते परशरामपंती आदि फितले असे. त्याहूशी अनुसंधान ठेवल्यास - वतनापासून दूर व्हाल. - स्वामींच्या पायांशी निष्ठा ठेवावी. "

---

- रामचंद्रपंताच्या या प्रचाराचा विपरीत परिणाम होऊन मराठी साम्राज्याचे दोन भाग झाले.

- ताराबाई - रामचंद्रपंतांच्या - वागणुकीला कंटाळून कोल्हापूरकडे येऊन राहिली.

संभाजीचरित्र - वा. सी. बेंद्रे

उपसंहार.

- बखरी - या इंडांगी इतिहासलेखनाचा दृष्टिकोन नाही. ह्यामुळे ललित साहित्यांत गणना होते.
- शिवाजी मृत्यूपूर्वी - मोगली सैन्य - महाराष्ट्रांत फिरणार होते.
- आदिलशहाने औरंगजेबाच्या नांवे खुत्बा पढणे केले होते.
- कुतुबशहाने - औरंगशाह खंडणी दिली होती,
- मोगल व विजापूर दोलशहाचे जोड सैन्य: मराठी स्वराज्यावर येणार होते.
- रजपूत व उत्तरेकडे - गेलेला वेळ संभाजीने राज्य सुस्थिर ठेवण्यासाठी खर्च केला.
- संभाजीने - भूदल व आरमार: गनिमी युध्दाचे धोरण आखले.
  - दारूगोळे कारखाने - डिचोली इ. दक्षिण भागांत हलवले.
  - आरमार उभारून - मालवणदुर्गचे रक्षण केले.
  - पावसाळ्यात चढाई - अनुकूल मुलुखांत मोहिमा.

---

- संभाजीला कैद केल्यानंतर राजारामाचे मंचकारोहण
- 25 मार्च - झुल्फिकारखानाचा रायगडला वेढा पडला.
- वेढा पडल्यानंतर सर्व मंडळी - राजारामाबरोबर प्रतापगडावर पळाली.
- कुठे वतनदारी फितूरकारी मंडळींना पकडण्यासाठी पातशहाने पाठलाग सुरू केला
- संभाजीचा विश्वासघात करणाऱ्यांनी राजारामास गादीवर बसवले.
- शाहूऐवजी राजारामाला मंचकारोहण कारण - विश्वासघाताचा सूड घेतला जाईल.
- राजारामाने - येसूबाई, जानकी, शाहू यांच्या सुरक्षेसाठी
  गिरजोजी यादवाला पाठवले. फितूरी - किल्लेदाराने
  नकार दिला (येसूबाईला - मोगलांच्या हवाली केले)

इंग्रज आणि संभाजी.

१६६२ साली- इंग्रज आरमाराने जंजिरा शिवाजीला देऊन टाका.

– शिवाजीने तो नरवारीसाठी मागा हे दूरदेशाज

– शिवाजीपासून मुंबई किल्ल्यामुळे रक्षित झाले.

१६८८ सिद्दीने आपली जनाना- मुसद्दी इंग्रजांच्या आश्रयास ठेवली.

– मुत्सद्दी- दंडाराजपुरीच्या आशेने सिद्दीला मदत करीत होते.

सुरतकरांनी– मराठ्यांना नोकरीला ठेऊ नये असे इंग्रजांना लिहिले.

– शिवाजीने सपन दाणागोटा बंद केला.

१६७४– इंग्रज शिवाजी तह झाला.

– शिवाजीच्या दमबाजीमुळे इंग्रजांनी सिद्दीला मुंबईबाहेर

– काढले.

– सिद्दीने मुंबईतील सैनिक भरती करण्याचा प्रयत्न केला

– इंग्रजांनी सिद्दीच्या नोकरीत जाण्याची शहरवासीयांना

– मनाई केली- दवंडी पिटली.

इंग्रजांनी मराठी टाईपचा छापखाना १६७७ साली सुरू केला.

इंग्रजांनी सिद्दी, मोगल यांना तोफा विकल्या.

– शिवाजीला दिल्या नाहीत

– शिवाजीने ८ तोफा त्यांच्याकडून मिळवल्या.

(आधुनिक शस्त्रास्त्रे- विषयी तत्संबंधी ज्ञान नसल्यामुळे

– मराठ्यांना इंग्रज व पोर्तुगीजांच्या तोफखाना नेहमीच

आवश्यक झाला.)

मुंबईचे आरमार १६७८– शिवाजीने जाळण्याचा

प्रयत्न केला.

– पोर्तुगीज आरमाराने विरोध केल्यामुळे.

– बेत सोडून द्यावा लागला.

स्वराज्याच्या आरमारासाठी इंग्रजांचे सहाय्य आवश्यक
होते. इंग्रज - सिद्दी - मोगल यांना मुंबईला आसरा देत.
मुंबईकर सुरतकरांच्या दबावाखाली वागत.
शिवाजीमहाराजांनी सुरत दोन्ही वेळेला लुटून इंग्रजांना
स्वराज्याला मदत करायला भाग पाडले.
सुरतकरांना मोगली कारकिर्दीत संरक्षण मिळेना.
शत्रू आरमारावर दबाव ठेवण्यासाठी - खांदेरी कोट उभा केला.
भर पावसाळ्यांत - खांदेरीवर माणसे शिवाजीने उतरवली - १ लाख
होन खर्चाची तरतूद केली.
इंग्रजांचे सैन्य परत गेले होते. शिवाजीने दोघांशी
तह केला होता - सिद्दी सूरतला परत गेला होता.
खांदेरीच्या कोटाचे काम चालू राहिले होते.
जुलैमध्ये मायनाक भंडारीने खांदेरीवर माणसे उतरवली.
इंग्रजांनी रिचेंज कुतमारीनिशी १९ सप्टेंबरला थॉर्प खांदेरीवर उतरला
६ आक्टो. कॅ. केग्विनने २ गुराबे, ३ शिबाडे, २ मचवे, १ पुतमारी
३६५ माणसांनिशी खांदेरीवर हल्ला चढवला

१८ ऑक्टो. चौलच्या दौलतखानाच्या आरमाराने इंग्रजांवर
हल्ला केला. डोव्ह गुराब पकडले - मराठ्यांचे ३०० मृत्यु पावले.
इंग्रजांनी १२ तोफांचे फोर्च्युन जहाज ३०० माणसांसह
सहाय्यास पाठवले.
खांदेरीवर १२ मोठ्या तोफा - १००० गोळे होते.
एकूण ५६० लोक हत्यारांनिशी होते.

३० जानेवारीला इंग्रज मराठे तह झाला.

आरमारी वेढा उठला. – खांदेरी लढा पूर्ण झाला.

इंग्रजांच्या वेढ्यांतून – सिद्दीला दाणागोटा पुरवून मराठ्यांनी कार्य तडीस नेले.

१६८० साली मुंबईकरांनी हिंदुंची गुरें न मारण्याचा निर्णय घेतला.

संभाजीने राजापुरच्या खाडीत आरमार इकडील करण्याचा निर्णय घेतला.

१२ ऑ. १६८१ – केरवडील गुरव पुजारी ख्रिश्चन झाला. देवळाच्या चाव्या हरभटाकडे दिल्या.

संभाजीने सर्व किनारपट्टीवर चौक्या बसवल्या. मुंबईकडे दाणावैरण येणार नाही याची काळजी घेतली.

(पृ. ३७४)

इंग्रज वकील गल्हादपंत ठेकाडे असून – ८ म्याने माळशाळून मुंबईला पैसे घेतले (लाच) असा आरोप केला आहे.

संभाजीने २००० माणसे जहाजांत मुंबईवर उतरविण्यासाठी तयार ठेवली होती.

संभाजीने इंग्रजांजवळ ८०० पिंपे दारू, ६० गोळ्या तोफा, १५० लहान जहाजे इतकी मागणी केली. इति केजविन.

सूरतकरांनी – यसोंबा उंदेरीवर सिद्दीला मदत करण्यासाठीच कारण मुंबईकरांनी १६८२. मुंबई बेट स्वतंत्र केले.

नागोठणे पेण येथे वखारी उघडल्यात.

जकातखंडणीबद्दल अडात शिवाजीशी जाणार नाही.

संभाजीने मुंबईसमोरील पलीते बेट ताब्यांत घेतले.
लंडनने कंपनीचे धोरण पसंत करून संभाजीला मदत करण्यासाठी आदेश दिले. सुरत करांनी पाळले जातील.

कोळीमागाच्या रक्षणासाठी संभाजीने इंग्रजांना २० खंडी दारूळ
५० हजार रु. रोख देऊ केले.

इंग्रजांना खांदेरी-उंदेरी प्रकरणात लंडन ऑथॉरिटी इंटरेस्ट नव्हता.

इंग्रजांनी लंडनहून अधिक सैन्य मागवले.
बेटाचा विस्तार- लोकसंख्या वाढण्याला सुरुवात झाली.
ब्रिटनच्या राजाने सुरत प्रेसिडेंटला- पूर्वेकडील ॲडमिरल जनरल
म्हणून घोषित केले.

१६८४- मुंबई बेट सुधारण्याचा प्रयत्न-
ठाण्यावरून विणकर आणून- कापड विणण्याचा प्रयत्न
सुरू केला
३- कंपन्या स्वतः सैन्य ठेवायला सुरुवात केली.

लंडन फर्मावरून- "संभाजीशी मैत्री करा"
"सुरतची वखार बंद करा"
"मोगल व सिद्दीला मुंबई बेटावर थारा देऊ नका"
"प्रेसिडेंटने मुंबईला राहिले पाहिजे"

१६८५ मध्ये इंग्रजांनी संघर्ष सुरू केले.
१६८६ लंडनवरून लिहितात
"मोगलांची ताबेदारी नको"
"मुंबईबेटावर मुख्य वखार स्थापन करा"
"पूर्वेकडील महत्त्वाचे स्थान म्हणून
मुंबईचा विस्तार करा"

- शिवाजीने खांदेरी युध्दांत जिंकलेले शिकार व कुरेषारी
मालासह परत केली.
- इंग्लजांशी मैत्री कायम राखली.
- मुंबईत कोळी - भंडारी यांचे भरणा जास्त होता.
- भारतांत इंग्लज साम्राज्यविस्ताराची कल्पना १६८० मध्ये
आचरणांत आणली गेली.
- इस्ट इंडिया कंपनीचा पत्रव्यवहार - संभाजीच्या बाजूने होता
— हे निर्विवादपणे सिध्द करते.

इंग्लज मराठे संबंधांतील मुद्दा -
- शिवाजी किंवा संभाजीने हेरखात्याचा वापर करून
- लंडन करांच्या अपेक्षा समजून घेतल्या नाहीत.
- त्यामुळे मुंबईऐवजी सूरतला महत्व राहीले.
- सूरतचा वापर मोगलांनी कुशलतेने करून घेतला.
- मुंबई नामुष्की कुचेरी झाली असतां
इंग्लजांकडून अपेक्षीत मदत - शिवाजी संभाजीला
मिळाली असती. सैन्यावर जास्त दबाव
आला असता.
- चांचेगिरीने व्यापार मंदावतो. स्वराज्याला नुकसानकारक आहे
- हे संभाजीला उमगले.
- शिवाजीपेक्षा संभाजीचा दृष्टिकोन
व्यापारवृध्दीचा होता.

संभाजीने व्यापार नियंत्रीत केला.
नियतीला प्रोत्साहन दिले.

# आदीलशाहीचा नाश.

अलीरस पुत्र सिकंदर आदीलशाही तख्तावर आला.
त्याचा सरदार राजनिष्ठ राहीले नव्हते. दक्खनी - परकीय सत्ता यांच्या
दुफळी निर्माण झाली. आदीलशाहीला शिवाजींच्या मदतीची
गरज भासू लागली.

जेधे शकावली:

सुलतान अजमशहाला टंबोरसावाने कोल्हापुराहून पळवून
आपेपालीकडे लावले. फेब्रु. ८३.

| | |
|---|---|
| दिलेरखानाने - तोफा घेऊन आलमट्या - | ऑक्टो. ८४ |
| विजापूर मोगल संघर्ष - शहाआलम विजापूरवर. | मे ८५ |
| खानजहानाचा विजापुरास वेढा ——— | — " — |
| भागानगरकरांनी ३ हजार स्वार. ३ लक्ष होन मदत दिली. | — " — |
| मादण्णा - आकण्णाचा खून - भागानगरकरांनी मोगलांशी तह | जून ८५ |
| औरंगजेब नगरहून सोलापुरास - | — " — |
| संभाजीने कुतबोस सहाय्यास पाठवले. | जुलै ८५ |
| कुतबीने पन्हाळ्याहून फौज रवाना केली | — " — |
| विजापूर ताब्यात आले ———→ | १३ सप्टे. ८५ |
| सर्जाखानाला पंचहजारी मनसब - बादशहाला अर्ज केली | — " — |

कवींद्र परमानंद सांगतात

"औरंगजेबाने सर्जाखानाच्या - फितुरी मदतीने विजापूर घेतला"
" संभाजीचा चहूकडे वेढा फिरवून पळून आला "

५ एप्रील ८०.
औरंगजेबाच्या जाचाने - विजापुरी नाणी पाडली.
सुलतान पदच्युत - मोंगलाचा मांडलीक सिकंदर झाला

मोठे: ८० - आदीलशाही व कुतबशाही उमराव
कल्याणपूरला औरंगजेबाला भेटले.

मोगल आदीलशहा तह : जुलै ८२ औरंगजेबाने आदीलशहाला १० लाख रु. खर्चासाठी दिले.

संभाजीविरुध्द मिरजला सैन्य एकत्रीत केले.

आदीलशाही इतिहासाप्रमाणे - शहाआलमच्या गोवा स्वारीत विजापूरकर मदत घेऊ शकले नाहीत - पाठीमागे सैन्य रवाना.

चिडून औरंगजेबाने आक्रमण धारवाड भाग मोगलांनी लुटला

१६८४ अखेर औरंगजेबाने शाहआलमला गणा-गणाच्या सह तोफा दिल्या

पोर्तुगीजांप्रमाणे - संभाजी आदीलशहाच्या पाठराख्याची भूमिका करील होता.

२२ फेब्रु. ८५ संभाजीच्या वकीलाने आदीलशहाची भेट घेतली.

६८ अखेर मोगलांनी अकुलांश पुनरिक जिंकला.

२५ मार्चपासून - विजापूरचा वेढा सुरू झाला.

३ एप्रील सर्जाखानाने रुहुल्लाखानवर मोगलांशी लढा दिला.

औरंगजेबाने कुतुबशहावर शाह आलमला पाठविले - जून अखेर.

नोव्हें. ८५ संभाजी व विजापूरकरांनी मोगली फौज मारून टाकली.
सुलतान अजमतारा = कैद साठा - आत्महत्या केली.

औरंगजेबाने - वेढा उठवण्याचा हुकूम दिला.

आजमशहाने विजापूर घेण्याची प्रतिज्ञा केली.

५ ~~डिसें~~ ऑक्टो. बादशहाने मदत पाठवली.

विजापूरचे वेढ्यांत - मोगलांना रसद मिळण्याचे मार्ग संभाजीने बंद केले. पाण्यांत विखार टाकला.

मोगलसेना - घोडे - उंट - खाऊन राहू लागले. इति बुसातिन.

बंजा नायक - विजापूरजवळ - आणत असलेली रसद - फिरोजजंगने - लुटली.

- गाझीउद्दीनखान - मोगलांना रसदपुरवठा २० हजार फौज
- मराठ्यांनी अंभणीजवळ लुटले.
- हंबीरराव डिसें. ८५ पिछाडीवर हल्ले चढवू लागला.

३ जुलै ८५ औरंगजेब स्वतः रसुलपुरांत आला.

१ सप्टेंबरपासून - किल्ल्यासभोवताली सुरुंग - दमदमे खोदले गेले.

७२ दिवस - बादशहाचे स्वतःच्या देखरेखीखाली किल्ल्याच्या तटाला वेढा भिडवला.

१२ तारखेला - बादशहाशी अब्दुल रौफ [illegible] वळून परवाना. १३ ला किल्ला कबजात दिला.

- सिकंदर बादशहा मोगल कैदेत १९ वर्षे होता. १६९९ मध्ये औरंगजेबाने त्यास विष देऊन मारले.

आदीलशहाने - संभाजीविरुद्ध मोगलांना मदत करूनसुद्धा

- संभाजीने कुतुबशहाचे सहाय्य विजापूरला मिळवून दिले.

मोगल कुतुबशहावर निघाले तेव्हां विजापूरकरांनी कुतुबशहाला सहाय्य केले नाही म्हणून मसाऊद आदीलशहाची वजिरी सोडून गेला.

आदीलशहाची वजिरी सोडून गेला. राजा संभाजीची [illegible]

- परिणामी आदीलशाहीचा नाश झाला.

कुतुबशाही मराठे तह भौगोलिक दृष्ट्या एकमेकांना उपकारक नव्हता

- परंतु राजाराम काळांत हा तह मराठा स्वराज्याला पोषक ठरला.

## कुतुबशाहीचा मोड.

कुतुबशाही सर्वात श्रीमंत शाही.

१५१२ - कुतुबशाहीची स्थापना -

१६६२ - अब्दुल्ला कुतुबशहाचा मृत्यु.
तानाशाह गादीवर आला

१६७४ - मादण्णा "सूर्यप्रकाशराव" प्रमुख दिवाण झाला.
हैदराबादला मोठा वाडा बांधला.

धाकटा भाऊ विसण्णा = सैन्याचा बक्षी.
विसणा च मृत्युंजय = पेशवा.
भाचा - वेंगण्णा - दुय्यम सेनापती.
भाचा - गोपण्णा रामदास - मुद्राबलाम प्रमुख
- " - पोडला - कुलीकुतुबा.

भागानगरात विश्वेश्वर मंदीर काढून तलाव बांधला.

- शिवाजीचे चोरपडेना पत्र
" कुतुबशहाला सामील व्हा. पठाण बळावयाचें चांगले नाही
- पठाणांस बुडवणे आवश्यक आहे "

- हिंदु मुस्लीम वैर - फारश्यांत जास्त प्रमाणांत नव्हते.

१६८० साली दिलेरखानाने विजापूरवर स्वारी केली तेव्हा
प्रत्यक्ष सैन्य न पाठवतां कुतुबशहाने
शिवाजीला पैसा पुरवला व सैन्यबळ उभे केले.

१६८१ - मोंगलांच्या पारिपत्यासाठी सीमेवर मो झांसंजर
पाठवला होता.
मोंगलांनी कुतुबशाहीविरोध स्वारीमुळे संभाजीला
भागानगरकरांनी १ लक्ष होन मदत दिली.

१४ मे १६८२ — दारा शुकोहपुत्र — मोहम्मदशाह. भागानगरी चढेल
सोडून गेला. शाहआलम पेशकश घेवून आला.

कुतुबशहाने ६० लाख रु. देऊन मोगलांशी तह केला.

कुतुबशहाने शिवाजीला आदिलशाही व कुतुबशाहीच्या
सीमेवरील संस्थाने जिंकण्यास मदत केली व
स्वतःच्या राज्याच्या सीमा सुरक्षीत केल्या.
— पश्चीम सीमा सुरक्षीत केल्या.

संभाजीने रामचंद्र मुतालिक ज्याला पाठवून —
कुतुबशाही आदीलशाही संभाजी यांची एकजुट केली.
— संभाजीने आदीलशाहीच्या सहाय्यार्थ १० हजारांची
नवीन पागा उघडली. घोडदळ उभारले.
कुतुबशहा संघटीत न झाल्यामुळे संभाजीचा डाव फसला
कुतुबशहाने गुलबर्ग्याहून १० हजार घोडदळ पाठवले.
सिद्दी मसाऊद — कुतुबशाही — मराठे यांची हातमिळवणी
औरंगजेबाने अकलूजसनच पण होतो आल्यामुळे
— तोड दिली नाही.

सर्जाखान किल्ल्यांत अडकला.
विजापूरच्या सैन्याला मसाऊदसारखा नेता लाभला नाही.
कुतुबशाही सैन्य बलाढ्य रक्षणार्थ इतरत्र राहिले नाही.

औरंगजेब — गुलबर्ग्याहून १६ ऑक्टो. ८५ मध्ये भागानगरकडे निघाला
जाने ८६ औरंगजेबाचे सैन्य — हैदराबादजवळ उतरला आले.
औरंगजेबाला शाहआलमचा संशय आला. २१ फेब्रु. ८७ ला
शाहआलम व मुलांना अटक केली.

१५ मे ८७ औरंगजेबाने वेढा मागे घेतला.
स्वतः औरंगाबादला रहाण्यास निघून गेला.

१६८७ औरंगजेबाची छावणीत २ लाख माणसे प्लेगने मेली.

दुष्काळाचे स्वरूप पाहिले -

स्वयपुरवठा - संभाजीचे मोडून पडला.

22 अप्रे. ८७ - फितुरीने गोवळकोंडा काबीज झाला.

अकबर व संभाजी डिचोलीस रहात होते.
सध्या नकजगा आहे. (इति- इश्वरदास)

२४ नो. ८३- जुवे बेटावरील किल्ला घेतला. सेंट इस्टेव्हं (स्टिफन) (रात्री १० वाजता)
हे बेट धावजी- तिसवाडीतील गावाच्या पैलतिरावर होते.
२॥ बेटांतून- गोवे शहरांत येता येत असे:- (पायी) ओहोटीला.
पोर्तुगीझांनी बेटावर किल्ला व धावजीला बुरुज बांधला होता.
व्हिसेरजई- जुवे बेटावर चालून गेला.
मराठ्यांनी त्याला दुप्पट्यावरोबर पळून गेले- पुष्कळ मारले गेले.
व्हीस धरली आहेत-किल्ले- गोव्यावरील हल्ला संभाजीने सोडून दिला.
२५ नो- मराठ्यांनी—
किल्ला आधस्मिकुरीत्या खाली केला कारण पोर्तुगीझांचे
आरमार हल्ला करायला निघाले.
(१५६० साली- आदीलशहाने. ८० हजार पायदळ.
३५ " घोडदळ.
२ " हत्ती.
तोफखाना.
यानिशीं बेटावर हल्ला चढवला- पोर्तुगीझ आरमाराने.
तरीच कत्तल केली म्हणून मृताचे बेट म्हणतात)
२५ डिसं संभाजीने- साष्टी बारदेश लुटले.
रायतूर व मुरगांव (साष्टी) किल्ले सोडून
संपूर्ण बारदेश व साष्टी संभाजीने जिंकला.
त्या दरम्यान्याच्या इशारीत मराठ्यांनी बोवा राहिले.

१६८४ मध्ये तिरजईने मुरगांवाला राजधानी स्थलांतरणाचे ठरविले.

१६८४ मध्ये संभाजीने चौलचा वेढा उठवला.
कुल्याण, मनोर, असेरी, कुरंगा, माहीम, तारापूर, डहाणूर, कुडवा इ. ठिकाणे जिंकली

१२ फेब्रु ८५ खेम सावंत, रामदळवी यांच्याशी तिरजईचा गुप्त तह
१) कुडाळ ते चौल भाग जिंकावा - २/३ पोर्तुगीझांना द्यावा.
२) आरमारी सहाय्य द्यावे.

१६८८ पर्यंत पोर्तुगीझांनी असेरी, मनोर, धारावी, जिवधन, - किल्ले परत मिळवले
१६८९ मोगलांनी धर्माजी नागनाथ द्वारे - किल्ला (फोंडा मिळवला)

संभाजीमृत्यूनंतर खेम सावंत सोडून
— इतर सर्व देसाई राजारामाला सामील झाले.

खेम सावंत - सर्व कुडाळ देसायांमध्ये -
अधिक सैन्य असलेला देसाई होता. १६९५ खेमसावंतकडे २ हजार - घोडदळ होते.
१६९५ पर्यंत कुडाळ सोडून पूर्ण गोवे: देसायांनी हस्तगत केले.
१६९८ मध्ये सर्व देसाई गोव्यात किल्ले घेऊन - मोगलांचे मुलुखात गेले.
फेब्रु. १६८९. खेम सावंतास औरंगजेबाकडून कुडाळ सरदेशमुखीचे पद दिले गेले.
जून ८९ - खेमसावंताने कोंढाणा किल्ला जिंकून घेतला -
कुडाळ पूर्णतया - मोगलांच्या अंमलाखाली गेले.
सारवळी डिचोली मणेरी पूर्वी मोगलांच्या ताब्यात गेले होते.

१६८२ - पोर्तुगीज सरकार मिनेझेस - इगाळतांनीही आचऱ्यावर हल्ला केला. देवालय उध्वस्त केले.

१६८४ खेम सावंताने ६ लढाऊ गलबते २० व्यापारी गलबते लुटली

१६८४ राजारामाने अंकोले, पांचमहाल, जांभवली, यांची सनद सावंतवाडकरांना दिली. (सावंतवाडकर मराठ्यांना खंडणी देत)

१६८५ खेम सावंताने - सांखळी, डिचोली, पेडणे महाल घेतले

१७०१ बारगड खेम सावंताने घेतला. कुडाळ, पेडणे, डिचोली, सांखळी, मणेरी यांचा सरदेसाई झाला.

१६८४ - खेम सावंताने स्वतःची नाणी पाडली.

१७०३ - खेम सावंताने मोगलांना मदत केली - मराठ्यांचा वेढा फुटला. फोंडागड खेम सावंताने जिंकला

जुलै १७०४ - फिरंगी व खेम सावंतांचे युध्द झाले. फिरंग्यांनी आमोणे, वळवई, डिचोली किल्ले जमीनदोस्त केले.

१७०५ - फोंड्यावर फिरंग्यांच्या मदतीने सावंतवाडकरांचा अंमल सुरू झाला.

१७०८ खेम सावंत ताराबाईला मिळाला - वतने कायम राखली.

- फिरंग्यांनी खोर्जुवे व पनळे बेटे खेम सावंताकडून घेऊन किल्ले बांधले.

- शाहूने बेटे परत मागितली

- फिरंग्यांनी दिली नाहीत.